# मंडणगड मध्ये पत्नीची हत्या करणाऱ्या पतीला अटक

दिनांक ०५/०४/२०१७ रोजी मंडणगड पोस्टे हद्दीत पंन्हाळी खुर्द या गावात एका बंद घरातुन दुर्गंधी येत असलेबाबत माहिती मंडणगड पो.स्टे. ला मिळाल्या नंतर पोलीस निरीक्षक विश्वास गोळे - पाटील व पथक तात्काळ सदर गावात पोहोचले. पोलीसांनी सदर बंद घराचा दरवाजा तोडून घरात प्रवेश केला असता घरामध्ये पोलीसांना एका गोधडीत महिलेचा मृतदेह मिळुन आला. सदर मृतदेहावर वार करण्यात आलेले होते व मृतदेह सडलेल्या अवस्थेत होता. सदर मृतदेह हा संगीता रमेश वाघमारे वय-४० वर्षे रा. पन्हाळी खुर्द ता. मंडणगड हिचा असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर मृतदेहाचे घटनास्थळीच शवविच्छेदन करुन मंडणगड पो.स्टे. येथे गुन्हा रजि. क्र. १६/१७ भादवि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करुन तपास सुरु करण्यात आला.

नमूद मयत महिला संगिता वाघमारे हिचा पति रमेश लक्ष्मण वाघमारे हा काही दिवसांपासुन गायब असल्याबाबत तपासादरम्यान पोलीसांना समजल्यानंतर पोलीसांनी तपासाचा रोख त्याच्या दिशेने वळवुन त्याच्या शोधार्थ पोलीस पथके रवाना केली. पोलीसांनी मंडणगड तालुका तसेच रायगड जिल्हयाचा खाडी किनारा पिंजुन काढला. दरम्यान आरोपी हा मंडणगड तालुक्यातील मौजे पाट येथे एका आंब्याच्या बागेत लपून बसलेबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलीसांनी त्याला तेथून ताब्यात घेतले. त्याच्याकडे पोलीसांनी केलेल्या चौकशीत त्याने त्याची पत्नी वर नमूद महिला संगिता वाघमारे हिचा खुन केल्याचे कबुल केले आहे. गुन्हा नोंद झाल्यानंतर मंडणगड पोलीसांनी सदर आरोपीला २४ तासाचे आत अटक करण्यात यश मिळवीले.

